वर्ष-०८ | अंक-३६ | मुंबई, मंगळवार, २६ जुलै ते १ ऑगस्ट २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024
PG|2

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

नागपुरात नाल्याला आलेल्या पुरात आईसह मुलगी गेली वाहून; आईचा मृतदेह सापडला, मुलगी बेपत्ता

1 → शिंदेंना मारण्याची सुपारी ?
मुंबईतील खड्ड्यावरुन मनसे आक्रमक ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# अजित पवार ॲक्शन मोडवर

## विदर्भ मराठवाड्याचा दौरा ठरला, चार दिवसात आठ जिल्ह्यांचा दौरा, शेतक-यांना भेटणार...

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी काल पत्रकार परिषद घेत राज्य सरकारला राज्यातील अतिवृष्टी झालेल्या भागात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. राज्यातील पूरस्थिती लक्षात घेता राज्य सरकारनं तातडीनं शेतक-यांना मदत करावी, असं आवाहन देखील अजित पवार यांनी केलं होतं. अजित पवार यांनी आता राज्यातील अतिवृष्टीनं नुकसान झालेल्या विदर्भ आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये पाहणी करण्यासाठी दौरा आयोजित केला आहे.

अजित पवार यांचा चार दिवसांचा दौरा उद्यापासून सुरु होत असल्याची माहिती आहे. अजित पवार पुढील चार दिवसात आठ जिल्ह्यांमध्ये जाऊन



पाहणी करणार आहेत.

### कसा असेल अजित पवारांचा पाहणी दौरा

राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस सक्रिय झाली आहे. राज्यातील जनतेच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. विधानसभेचे विरोधीपक्षनेते अजित पवार यांनी कालचं पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ओला दुष्काळ जाहीर करत राज्यातील शेतक-यांना एसडीआरएफच्या निकषांपेक्षा अधिक रक्कम मदत म्हणून द्यावी अशी मागणी केली आहे. अजित पवार यांच्या विदर्भ मराठवाडा दौ-याची सुरुवात उद्यापासून होणार आहे. पुढील चार दिवसात अजित पवार गडचिरोली, चंद्रपुर, वर्धा, यवतमाळ हिंगोली, नांदेड, बीड, औरंगाबाद जिल्ह्यात पाहणी करणार आहेत.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेत ओला दुष्काळ जाहीर करुन विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली होती. एकनाथ शिंदे यांच्या सरकारनं बहुमत आहे तर मंत्रिमंडळ अस्तित्वात आणावं. अतिवृष्टी सुरु झाल्यापासून राज्यात कित्येक भागात शेतक-यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत.

# राज्यात प्लास्टिक बंदी बाबत सरकारचा नवा निर्णय...!

## जाणून घ्या कशावर असणार आता बंदी



**मुंबई** : प्लास्टिक लेपीत आणि प्लास्टिकचा थर असलेल्या उत्पादनांवर बंदीचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील प्लास्टिकच्या वापरामुळे निर्माण होणा-या गंभीर समस्या लक्षात घेता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्लास्टिक बंदी नियमामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारने १ जुलै २०२२ पासून सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घातली आहे. राज्यात या बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र हे सिंगल युज प्लास्टिक बंदी करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

**कोणकोणत्या वस्तुंवर असेल बंदी**

राज्यात प्लास्टिक बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने ७ जुलै २०२२ च्या बैठकीत महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकॉल उत्पादने अधिसूचना २०१८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्य सरकारने १५ जुलै २०२२ ला अधिसूचनेद्वारे प्लास्टिक लेपीत आणि प्लास्टिकचा थर असलेल्या उत्पादनांवर देखील बंदी घातली आहे. या सुधारणेनंतर राज्यात प्लास्टिक लेपीत तसेच प्लॅस्टिक थर असणा-या पेपर किंवा ॲल्युमिनियम इत्यादींपासून बनवलेले डीस्पोजेबल डीश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर इत्यादी एकल वापरावर, वापर उत्पादनावर आता बंदी असणार आहे.

दैनंदिन कच-यातील प्लास्टिकचा कचरा कमी करणे हा बंदीमागचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील शहरे, ग्रामीण भागात दैनंदिन कच-यातील प्लास्टिकचे प्रमाण लक्षणीय आहे. यातील कच-याचे विघटन व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. हा कचरा जलाशयांमध्ये व कचरा डेपोत फेकला जातो किंवा पुनर्प्रक्रिया शक्य नसल्याने रात्रीच्या वेळी हा कचरा थेट जाळला जातो.

# नवनिर्वाचित राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे बॅनर वसईत अज्ञाताने फाडले...!

**नालासोपारा** : देशाच्या नवनिर्वाचित राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निवडीचे अभिनंदनाचे बॅनर वसईत अज्ञात व्यक्तीने फाडले आहेत. भाजपच्या ड. साधना धुरी यांनी वसईच्या साई नगरच्या वार्ड क्रमांक ९७, ९८ मध्ये हे बॅनर लावले होते. रविवारी (ता. २४) सायंकाळी हे बॅनर अज्ञात व्यक्तीने फाडले. ही घटना कळताच भाजपसह राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांत तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.



भाजपच्या वसई रोड शहर मंडळाच्या वतीने द्रौपदी मुर्मू यांची देशाच्या राष्ट्रपतिपदी निवड झाल्यामुळे हार्दिक अभिनंदन करत, ५००० वर्षांपूर्वी महाभारतात अन्याय झालेल्या द्रौपदीस आज न्याय मिळाला, अशा आशयाचे वसई साई नगर वार्डमध्ये बॅनर लावले होते. ५४ वर्षीय मनोज शर्मा यांना ही बातमी कळताच त्यांनी तात्काळ बॅनर उतरवले. यावेळी अज्ञात व्यक्ती विरोधात माणिकपूर पोलिस ठाण्यात भा.द.वि. कलम ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कल्याण-मुरबाड रेल्वेच्या कामाला सप्टेंबरअखेर प्रत्यक्ष सुरुवात?

**कल्याण** : अनेक वर्षांपासून रखडलेल्या महत्त्वपूर्ण कल्याण-मुरबाड रेल्वेच्या प्रत्यक्ष कामाला सप्टेंबरअखेर सुरुवात होईल, असे आश्वासन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांना दिले आहे. या प्रकल्पाच्या निविदा मंजूर करण्याची कार्यवाही वेगाने करण्याचे आदेश देण्यात आले असून, हा केवळ तुमच्या लोकसभा मतदारसंघातीलच नव्हे तर माझा महत्त्वाचा प्रकल्प असल्याचेही वैष्णव यांनी स्पष्ट केले.

राज्यात सत्तापालट होताच, केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुरबाड रेल्वेमार्गाच्या रखडलेल्या परिस्थितीकडे लक्ष वेधले. या मार्गासाठी राज्य सरकारकडून ५० टक्के वाटा उचलण्याची हमी महाविकास आघाडीकडून दिली गेली नसल्याचे निदर्शनास आणले.

त्यानंतर राज्य सरकारने युद्धपातळीवर हालचाली करून दुस-या दिवशीच रेल्वे मंत्रालयाला महाराष्ट्र सरकारकडून ५० टक्के खचार्ची हमी घेतली जाणार असल्याचे पत्र पाठविले. त्यामुळे नव्या भाजप-शिवसेनेच्या राजवटीत कल्याण-मुरबाड रेल्वेला गती येणार असल्याचे स्पष्ट झाले.या



पार्श्वभूमीवर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्लीतील रेल भवन येथे केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी भेट घेतली. रेल्वे प्रकल्पांच्या मान्यतेसाठी तांत्रिक मुद्द्यांबरोबरच विविध मान्यतांमुळे जादा कालावधी लागण्याची शक्यता असते. मात्र, कल्याण-मुरबाड रेल्वे प्रकल्प हा एक हजार कोटी रुपयांपेक्षा कमी किमतीचा असल्याने त्याला मान्यता देण्याचा अधिकार रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे आहे. ते या प्रकल्पासाठी अनुकूल असल्यामुळे कल्याण-मुरबाड रेल्वे मार्ग लवकर मार्गी लागणार असल्याची अपेक्षा आहे. सध्याच्या रेल्वेच्या नियमावलीनुसार, कल्याण-मुरबाड रेल्वे प्रकल्पाचे कार्यकारी संचालक समितीद्वारे मूल्यमापन होईल. त्यानंतर वित्तीय समितीच्या सदस्यांद्वारे तत्त्वतः मान्यता दिली जाईल. मुरबाड रेल्वे प्रकल्पाची निश्चित केलेली ८५७ कोटींची किंमत व त्याची व्यवहार्यता तपासून तो मंजुरीसाठी नीती आयोग व अर्थ मंत्रालयाकडे पाठविला जाईल. त्याला नीती आयोगाचे मूल्यांकन मिळाल्यानंतर २१ दिवसांत रेल्वेच्या विस्तारित बोर्डाच्या बैठकीत मान्यता दिली जाणार आहे. या प्रकल्पाला रेल्वे बोर्डात अंतिम मंजुरी दिली जाऊन, त्याच्या प्रती नीती आयोग, अर्थ मंत्रालय आणि सांख्यिकी विभागासह सर्व सदस्यांना वितरित केल्या जातील. विशेष म्हणजे एखाद्या प्रकल्पाची किंमत एक हजार कोटी रुपयांपेक्षा कमी असेल तर त्याला रेल्वेमंत्री मंजुरी देऊ शकतात. त्यामुळे कल्याण-मुरबाड रेल्वेमागार्चे काम सप्टेंबरअखेरपर्यंत प्रत्यक्षात सुरू होईल, अशी ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.

# वर्सोव्यात बस स्टॉपवर व्यक्तीची पेव्हर ब्लॉकने ठेचून हत्या...!




**मुंबई** : दिल्लीतील एका २५ वर्षीय व्यक्तीवर वसोर्वा येथील बस स्टॉपवर पेव्हर ब्लॉकने हल्ला करून त्याची हत्या करण्यात आल्याचा गुन्हा वसोर्वा पोलिसांनी दाखल केला आहे. पीडित सूरज मनोज तिवारी याच्यावर शनिवारी रात्री उशिरा सात बंगला परिसरातील बस स्टॉपवर हल्ला करण्यात आला. रविवारी सकाळी तिवारी यांचा मृतदेह रस्त्याने जाणा-या व्यक्तिला दिसला आणि पोलिसांना कळवण्यात आले. मृत व्यक्तीच्या शरीरावर डोक्याला अनेक जखमा आढळून आल्याचे पोलिसांना तपासात आढळले. तिवारी हा दिल्लीतील पालम भागातील असून तो संगीतकार असल्याचे तपासात समोर आले आहे. आरोपीची ओळख पटवण्यासाठी पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. आरोपीची ओळख पटवण्यासाठी फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकाची वसोर्वा पोलीस तपासात मदत घेत आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेत कोरोना लसीकरण



**ठाणे** : जिल्हा परिषदेच्या वतीने सोमवारी अधिकारी आणि कर्मचा-यांसाठी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणासाठी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. पुष्पा पाटील, उपाध्यक्ष सुभाष पवार व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्यासह १५३ अधिकारी व कर्मचा-यांनी बूस्टर डोस घेतला.

पहिला आणि दुसरा डोस व बूस्टर डोस करिता पात्र असलेल्या अधिकारी आणि कर्मचा-यांचे विशेष सत्रात लसीकरण करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्या संकल्पनेतून हे विशेष सत्र घेण्यात आले. यावेळी सुमारे १५३ कर्मचा-यांचे लसीकरण करण्यात आले. सर्व जिल्हा परिषद कर्मचारी तसेच ठाणे जिल'ातील लसीकरणास पात्र सर्व नागरिकांनी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण करून घेण्याचे आवाहन यावेळी अध्यक्षा श्रीमती पाटील यांनी केले.

# ठाणेकरांनो काळजी घ्या! स्वाईन फ्लूसह डेंगी, मलेरियाही फोफावतोय

**ठाणे** : कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आला असताना 'स्वाईन फ्ल्यू'ने ठाण्यात डोके वर काढल्याचे चित्र आहे. ठाण्यात एकट्या जुलै महिन्यात २० स्वाईनचे रुग्ण आढळून आले असून यात आतापर्यंत दोन महिलांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे पालिकेची आरोग्य यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे. ठाण्यात एकट्या जुलै महिन्यात स्वाईन फ्ल्यूचे




२० रुग्ण आढळून आले असून, यातील १५ जण उपचार घेऊन त्यांना घरी पाठवण्यात आले आहे; तर ३ रुग्ण अजूनही रुग्णालयात दाखल आहेत. यापैकी २ रुग्ण हे ठाणे हेल्थ केअरमध्ये उपचार घेत असून, एक रुग्ण ज्युपिटर रुग्णालयात दाखल आहे.

स्वाईनने मृत झालेल्या दोनपैकी एक महिला ७१ वर्ष, तर दुस-या महिलेचे वय ५१ आहे. यातील पहिली महिला शहरातील जितो रुग्णालयात १४ जुलैला उपचारासाठी दाखल झाली होती. १९ जुलैला त्यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला; तर दुसरी महिला १४ जुलैला ठाणे हेल्थ केअर हॉस्पिटलमध्ये दाखल झाली, त्यांचा १८ जुलैला मृत्यू झाला. ठाण्यात पावसाला सुरुवात झाल्यानंतर साथीच्या आजारांनी डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर पालिका क्षेत्रात औषध फवारणी व उपाययोजना करण्याच्या सूचना पालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

# झोका खेळताना गळफास लागून ११ वर्षीय चिमुरडीचा र्दुदैवी मृत्यू

**भिवंडी** - आई-वडील कामावर गेले असता घरात मुलांनी विरंगुळा म्हणून झोका खेळण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यावेळी लक्ष ठेवण्यास कोणी मोठी व्यक्ती नसल्याने एका ११ वर्षीय चिमुरडीला आपला प्राण गमवावा लागल्याची खळबळजनक घटना भिवंडीतील भादवड गाव पुंडलिक नगर येथे रविवारी घडली. पोलिसांनी या प्रकरणी नोंद घेऊन चौकशी सुरू केली आहे. वर्षा असे मृत मुलीचे नाव आहे. तिचे वडील श्रीजन मोतीलाल गौतम व



त्यांची पत्नी असे दोघेही भिवंडीतील सोनाळे येथे मोलमजुरी करून राहतात. त्यांची मुलगी वर्षाकडे ५ वर्षीय मुलगा व दहा महिन्यांची मुलगी सांभाळण्याची जबाबदारी असे.

नेहमीप्रमाणे पती-पत्नी कामावर गेले असता घरात असलेल्या वर्षाने शेजारी राहणा-या मैत्रिणीसह झोका खेळण्यासाठी घराच्या दरवाजात साडी बांधून झोका तयार केला; परंतु यावर झोका खेळत असताना झोक्याला पिळ देत गिरकी घेतली असता तो पिळ गळ्याला घट्ट बसल्याने वर्षाचा जीव गुदमरून मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच शांतीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# अस्मितेचा भगवा झेंडा काढल्यान, शिरढोणकरांचा आत्मदहन इशारा...!







**मुंबई**- गेल्या ४० वर्षापासून शिराढोण( जि. धाराशिव ) येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात दिमाखाने फडकत असलेला अस्मितेचा भगवा झेंडा कळंब तालुका प्रशासनाने काढल्याचे वृत्त कळताच शिरढोणकर संतप्त झाले असून त्यांनी सामूहिकरित्या आत्मदहनाचा इशारा दिला आहे. तसेच याबाबतचे निवेदन देण्यासाठी एक शिष्टमंडळ मुंबईलाही रवाना झाले आहे.

शिराढोणकर काळोख अंधारात सतत लढत राहिले आणि सकाळी उजेडणा-या दिवसाला तोच झेंडा, त्याच ठिकाणी गेली 40 वर्षे डौलात फडकवत ठेवला. हा ध्वज काढू न देण्याचा ठराव 27 जून 2022च्या ग्रामसभेत घेण्यात आला. असे असतांनाही कळंब तालुका प्रशासनाने पुन्हा एकदा हा ध्वज काढण्याचे पत्र दिल्यानंतर ग्रामस्थांनी भर पावसात ठिय्या आंदोलन केले. तसेच प्रशासनाने ध्वज काढण्यासाठी ग्रामस्थांना सांगितल्याचे कळते. आजही छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकात फडकत असलेल्या अस्मितेच्या भगव्या ध्वजासाठी संघर्ष करावा लागतोय ही लाजिरवाणी बाब आहे. त्यामुळेच संतप्त शिराढोणकरांनी प्रशासनाला आत्मदहनाचाही इशारा दिला आहे. याबाबत एक शिष्टमंडळ मंत्रालयात मुख्यमंत्र्यांचा भेटीला आल्याचेही कळते. यावेळी भेटीसाठी सरपंच पद्माकर पाटील, पंचायत समिती सदस्य राजेश्वर पाटील किरण पाटील,नितीन पाटील, नवनाथ खोडसे आदी उपस्थित होते. आणि आंदोलनात शिरढोणचे ग्रामस्थ मोठ्याप्रमाणात सहभागी झाले होते.

# शिंदेंना मारण्याची सुपारी ?

## हा काही पहिला प्रयोग नाही, राणेंनी यादीच वाचली...

**मुंबई**: एकनाथ शिंदेंना मारण्याची सुपारी दिली, हा काही पहिला प्रयोग नाही, असं म्हणत भाजपचे केंद्रीय नेते नारायण राणे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर अत्यंत गंभीर आरोप केला आहे. संजय राऊत यांनी उद्धव ठाकरेंच्या घेतलेल्या मुलाखतीचा भाग आज प्रसारित झाला. त्यात उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाकरी भाषेत समाचार घेतला आहे. त्यावर एकनाथ शिंदेंनी तर नाही पण, नारायण राणेंनी मात्र जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. नारायण राणे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका केली आहे. त्यांनी राणे पॅटर्नने उद्धव ठाकरेंवर शाब्दिक वार केले आहेत.

**एकनाथ शिंदेंना मारण्याची**



**सुपारी हा पहिला प्रयोग नाही - नारायण राणे**


एकनाथ शिंदेंना मारण्याची नक्षलवाद्यांना सुपारी दिली होती. हा काय पहिला प्रयोग नाही. साहेबांनी मोठे केलेल्या कर्तबगार माणसं शिवसेनेत उपजायला लागली, त्यावेळेला एक एकाला कमी करण्याचं काम यांनी केलं. रमेश मोरेची हत्या कुणी केली? जयेंद्र जाधव यांची हत्या कुणी केली? ठाण्याचा एक नगरसेवक, त्याची हत्या कुणी केली? नारायण राणेने २००५ ला शिवसेना सोडली, कोणाला सुपा-्या नाही दिल्या. देशाबाहेरच्या गँगस्टरला सुपारी दिली. मी समर्थ होतो तोंड द्यायला. मी वाचलो तो माझ्या आई-वडिलांच्या पुण्याईमुळे. तोंड उघडू नये, ज्यांना सुपा-्या दिल्या ते माझ्याशी बोलले की आम्हाला असं असं काम मिळालं आहे. तुम्ही सावध राहा, नाहीतर दुसरं कुणी हे काम करेल. त्यामुळे एकनाथ शिंदेंची सुपारी ही काही पहिली वेळ नाही, असा गंभीर आरोप नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

# श्रीरामाने खालेले कंदमुळ म्हणून विकले जाणारे काप म्हणजे नेमके काय

## वाचा म्हणजे वस्तूस्थिती समजेल

रत्नागिरी अर्थात ज्योतिबा डोंगरावर कधी तुम्ही गेलात का? त्या डोंगरावर काही विक्रेते रामाने खाल्लेले कंदमूळ म्हणून भलामोठा खोडाचा भाग अस्सल कंदाचे काप विकत असलेले तुम्ही पाहिले असेल. ते काप म्हणजे नेमकं काय हे कधी तुम्ही विचार केलाय का? तर हे कंदमूळ वगैरे काय नसून आपल्याकडे आढळणाऱ्या वनस्पतीच्या खोडाचा भाग आहे.

आपल्या गावाकडे येऊन अनेक लोक जोतिबाला जातात. यातील आपल्या अनेक पिढ्यांनी कंदमूळ खाल्ला असेल. श्रीराम प्रभू न खाल्लं म्हणून आपण खूप श्रद्धेने खाल्ल असेल. रामायणामध्ये प्रभू रामचंद्रांना आणि माता सितेला तसेच लक्ष्मण यांना १४ वर्षे वनवास भोगावा लागला होता. वनवासात प्रभू रामचंद्र आणि





वनस्पतीचा असेल आपल्याला प्रश्न पडला असेल. तविक्रेते सांगतात की ते जंगलातील वनस्पतीचे मूळ आहे.

कोल्हापुरातल्या काही संशोधकांनी या सगळ्यावरचा पडदा उठला आहे. कोल्हापुरातील वनस्पती शास्त्रज्ञ डॉक्टर विनोद शिंपले, डॉक्टर. निलेश पवार, डॉक्टर मानसिंग राजे निंबाळकर,



सीता यांनी कंदमुळे खाऊन दिवस काढले असल्याचे विक्रेते सांगतात. त्यामुळे जत्रेमध्ये गेल्यावर लहान मुल हे काप हमखास आवडीने खातात. एवढं मोठं मूळ कोणत्या यांना याबाबत शंका आली.नेमकं हे कोणत्या वनस्पतीचा मूळ आहे आणि हे खरंच शोधण्याचा उत्सुकतेपोटी त्यांनी प्रयत्न केला. विक्रेत्यांना विचारले असता हे मूळ आफ्रिकेतून आयात करण्यात आले आहे असे सांगण्यात आले.

संशोधकांनी कंद मूळ म्हणून विकल्या जाणाऱ्या विक्रेत्याकडून काही काप खरेदी केले.



प्रयोगशाळेमध्ये या वनस्पतीची संरचना तपासली. त्यामुळे कोल्हापूर कंदमूळ म्हणून विकला जाणारा हा काप एकदल खोडाचा भाग असल्याचे त्यांच्या लक्षात आले.पण कंदमूळ म्हणून विकले जाणारे वनस्पती बाहेरून आयात केलेली नसून आपल्याकडे माळरानावर आढळणारे केकताड किंवा घायपात ही वनस्पती आहे. या वनस्पतीपासून दोरखंड बनवले जात होते.

पण कंदमूळ म्हणून विकल्या जाणाऱ्या वनस्पती ची पूर्ण वाढ झाल्यानंतर तिला मधोमध एक बांबू सारखा कोंब येतो. त्याच्या टोकाला फुलोरा येऊन त्याला बीज लागतात या फुलातून बीज रुजून त्या झाडावर त्याची छोटी छोटी पिल्लं तयार होतात हे वनस्पतीची वैशिष्ट्ये आहे.

या अवस्थेत वरचा बांबू आणि बाजूचे पाने काढून टाकले जातात.त्यास कंदमुळांसारखा आकार देऊन त्यावर लाल रंगाची काव लावून तुम्हाला जमिनीतून काढलेला आहे असे भासवून त्याचे करून विक्री केले जाते.संशोधकाने अनोखी चाचणी करून या वनस्पतीच्या खोडाचा शोध घेतला डीएनए बारकोडींग पद्धतीचा वापर करण्यात आला. काप म्हणून विकले जाणार जेनेरिक नैसर्गिक रित्या गोड नसतात. त्यावर सॅकरीन टाकून ते गोड करण्यात येते. पण त्यामुळे ते काप अति प्रमाणात खाल्ल्यास अपायकारक ठरू शकते असे तज्ज्ञांचे मत आहे.

# रेडिओ सिटी महाराष्ट्रामध्ये सिटीचा ई-बाप्पा आणि बेंगळुरू व हैद्राबादमध्ये सिटी गणेशोत्सवासह साजरा करत आहे गणेशोत्सव

मुंबई, मंगळवार : दरवर्षी गणेशोत्सव राज्यांमधील नागरिकांमध्ये प्रचंड आनंद व उत्साह घेऊन येतो. यंदा कोविड-महामारीमुळे उत्सव साजरा करण्यावर काहीशी बंधने असताना देखील नागरिकांमध्ये गणेशोत्सव साजरा करण्याचा उत्साह कायम आहे. सद्यस्थिती लक्षात घेत रेडिओ सिटी या भारताच्या आघाडीच्या रेडिओ नेटवर्कने अगदी नेहमीसारखा, पण व्हर्च्युअली जल्लोषात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'सिटीचा ई-बाप्पा' उपक्रम सुरू केला आहे.

'सिटीचा ई-बाप्पा'च्या माध्यमातून मुंबई व महाराष्ट्रातील रेडिओ सिटी आरजे श्रोत्यांसह संवाद साधतील, झूमवर ऑनलाइन गेम्स खेळतील आणि काही विजेत्यांची निवड करतील, ज्यांना आकर्षक बक्षीसांसह पुरस्कारित करण्यात येईल. भाग्यवान विजेत्यांना एकत्र उत्सवाचा आनंद साजरा करण्यासाठी त्यांच्या इमारती/घरांमध्ये व्हर्च्युअली आरजेंना आमंत्रित करण्याची संधी देखील मिळेल. रेडिओ सिटी आरजे सेलिब्रिटींशी संलग्न होतील, नागरिकांसोबत साजरीकरणांच्या झलक शेअर करतील आणि महामारीदरम्यान उत्सव साजरा करण्याच्या त्यांच्या अनुभवांना देखील शेअर करतील. दरवर्षीप्रमाणे पुण्यामध्ये आमचे आरजे १० दिवस दगडूशेठ गणपती मंदिर व श्री कसबा गणपती येथील लाइव्ह शो अनुक्रमे सकाळी व सायंकाळी प्रसारित करतील. गणेशभक्तांना त्यांच्या घरामध्येच आरामशीरपणे डिजिटल स्ट्रिमिंगच्या माध्यमातून १० दिवस दोन्ही मंदिरांमधील उत्सवांचा आनंद घेण्याची संधी मिळेल.




याबाबत बोलताना रेडिओ सिटीचे चीफ क्रिएटिव्ह ऑफिसर श्री. कार्तिक कल्ला म्हणाले, 'रेडिओ सिटीने नेहमीच श्रोत्यांशी संलग्न होण्याकरिता नवनवीन मार्गांचा अवलंब केला आहे. 'सिटीचा ई-बाप्पा' हा आमच्या कटिबद्धतेला सिद्ध करणारा आणखी एक उपक्रम आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आमचा लोकांना त्यांच्या घरामधूनच सुरक्षितपणे हा उत्सव साजरा करण्यामध्ये मदत करण्याचा आणि या व्हर्च्युअल साजरीकरणाच्या माध्यमातून आमच्या श्रोत्यांमध्ये उत्सवाचा उत्साह व जल्लोष कायम ठेवण्याचा मनसुबा आहे. रेडिओ सिटीमध्ये आम्ही सध्याच्या आव्हानात्मक काळामध्ये देखील आमच्या श्रोत्यांमध्ये आनंद, सुसंगता व सकारात्मकतेचा प्रसार करण्याचे आमचे ध्येय पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरूच ठेवू.'

मुंबईमध्ये श्रोत्यांची सुरक्षितता लक्षात घेत आणि त्यांच्या घरांमध्ये उत्सवाचा उत्साह आणत रेडिओ सिटी दररोज सकाळी व सायंकाळी रेडिओवर लाइव्ह आरती प्रसारित करेल. अष्टविनायक गणपतींबाबत ऑडिओ माहितीपटाचे पॉडकास्ट्स देखील रेडिओवर प्रसारित करण्यात येईल. रेडिओ सिटी नागरिकांसोबत संलग्न होण्याकरिता त्यांच्या सोशल मीडिया हँडल्सवर विविध डिजिटल स्पर्धा देखील घेणार आहे.

रेडिओ सिटीच्या बेंगळुरू व हैद्राबादमधील त्यांच्या श्रोत्यांसाठी देखील अशा प्रकारच्या योजना आहेत. गणेशोत्सवाच्या १० दिवसांदरम्यान रेडिओ सिटी आरजे 'सिटी गणेशोत्सव'च्या माध्यमातून श्रोत्यांना दररोज सायंकाळी वाजल्यापासून मंडळामधील गणेशोत्सव साजरीकरणाचा अनुभव देतील. मंडळामध्ये गणेशोत्सवाचा आनंद घेण्याची आठवण येणाऱ्या श्रोत्यांसाठी रेडिओ सिटी शहरभरातील विविध मंदिरांमधील लाइव्ह आरती देखील प्रसारित करणार आहे. तसेच सर्व फूडी श्रोत्यांसाठी रेडिओ स्टेशन घरामध्ये सहजपणे बनवता येऊ शकणा-या रेसिपीज सांगण्यासाठी तज्ञांना आमंत्रित करणार आहे. मधुरमय संगीत, पॉवर पॅक मनोरंजन आणि हलके-फुलके स्टॅण्ड-अप कॉमेडी तुमच्या घरी मनोरंजनासाठी येणार आहेत.

गणेशोत्सवासंबंधित अद्ययावत माहितीसाठी तुम्ही :http://epaper.mid-day.com ला सबस्क्राईब करत येथे क्लिक करा.

रेडिओ सिटीकडून सर्व श्रोत्यांना गणेशोत्सवाच्या आनंदमय शुभेच्छा!

# बँकिंग आणि वाहन क्षेत्राच्या जोरावर शेअर बाजारात किरकोळ वाढ

मुंबई, मंगळवार : भारतीय निर्देशांकाने आज दिवसभरात घसरण सुरु असली तरी अखेरच्या क्षणी बाधत घेत बाजार बंद झाला. या नफ्याचे नेतृत्व बँकिंग आणि वाहन क्षेत्राने केले. निफ्टी ०.०५% किंवा ५.८० अंकांनी वधारला व ११,४७२.२५ अंकांवर स्थिरावला. एसअँडपी बीएसई सेन्सेक्सने ०.१२% किंवा ४४.८८ अंकांची वृद्धी घेतली व तो ३८, ८४३.८८ अंकांवर थांबला. आजच्या व्यापारी सत्रात जवळपास ११९२ शेअर्सनी नफा कमावला, १४१९ शेअर्स घसरले तर १०४ शेअर्स स्थिर राहिले.

एंजल ब्रोकिंग लिमिटेडचे प्रमुख सल्लागार श्री अमर देव सिंह यांनी सांगितले की आजच्या व्यापारी सत्रात टाटा मोटर्स (५.३२%), बजाज फायनान्स (४.७५%), एसबीआय (३.३८%), टेक महिंद्रा (२.२८%) आणि आयशर मोटर्स (२.१८%) हे निफ्टीतील टॉप गेनर्स ठरले. तर गेल (१.१७%), एनटीपीसी (१.५२%), सन फार्मा (१.४०%), टाटा स्टील (१.२९%) आणि डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज (१.१७%) हे निफ्टीतील टॉप लूझर्स ठरले.

बँकिंग आणि ऑटो सेक्टर वगळता सर्व क्षेत्रीय निर्देशांकांनी कमकुवत व्यापार केला. बीएसई मिडकॅप आणि बीएसई स्मॉलकॅपने अनुक्रमे ०.५१% आणि ०.११% ची काहीशी वृद्धी घेतली.

टाटा मोटर्स: टाटा मोटर्सचे शेअर्स ५.३२% नी वधारले व १२७.६५ रुपयांवर व्यापार केला. पुढील तीन वर्षात कंपनीने शून्य कर्ज स्थिती मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, असे कंपनीचे अध्यक्ष एन चंद्रशेखरन यांनी सांगितले. कंपनीचे निव्वळ ऑटोमोटिव्ह कर्ज ४८,००० कोटी रुपये आहे.

प्रॉक्टर अँड गॅंबल हायजिन अँड हेल्थ केअर: २०२० या वित्तीय वर्षात चौथ्या तिमाहितील नफा १३.८% नी वाढून ६९.२ कोटी रुपये झाला. कंपनीचा महसूल ६३४.५ कोटी रुपयांनी घसरला. परिणामी कंपनीचे स्टॉक्स १.३६% नी वधारले व त्यांनी १३०.६० रुपयांवर व्यापार केला.

अलकार्गो लॉजिस्टिक्स लिमिटेड: कंपनीचे दोन्ही प्रमोटर्स कंपनीचे इक्विटी शेअर्स दोन्ही एक्सचेंजमधून काढून घेण्याचा विचार करत आहेत, अशी माहिती कंपनीने एक्सचेंजला दिली. परिणामी कंपनीचे शेअर्स १९.९८% नी वाढले व त्यांनी १३०.६० रुपयांवर व्यापार केला.

एलआयसी हाऊसिंग फायनान्स: एलआयसी हौसिंग फायनान्स कंपनीने ८.०८ टक्क्यांची वृद्धी घेतली व शेअर्सनी २९८.९५ रुपयांवर व्यापार केला. २०२१ या वित्त वर्षातील जून महिन्याच्या तिमाहीत कंपनीच्या निव्वळ नफ्यात ३४% ची वाढ झाली. कंपनीचा निव्वळ नफा ८१७.४८ कोटी रुपये झाला.

भारतीय रुपया: देशांतर्गत इक्विटी मार्केटमधील चढ-उतारामुळे भारतीय रुपया आज अमेरिकी डॉलरच्या तुलनेत फ्लॅट म्हणजेच ७४.८३ रुपयांवर स्थिरावला.

जागतिक बाजार: हँगसेंगने ०.२६% ची घसरण घेतल्याने, ही कंपनी वगळता युरोपियन आणि आशियाई निर्देशांकांनी आज सकारात्मक व्यापार दर्शवला. कोरोना विषाणूच्या लसीच्या विकासातील प्रगतीमुळे गुंतवणुकदारांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाल्या. नॅसडॅकने ०.६०%, निक्केई २२५ ने १.३५%, एफटीएसई १०० ने ०.२४% आणि एफटीएसई एमआयबीने ०.९३% ची वृद्धी अनुभवली.

# रोहित शेट्टी बेस्ट बसवर आरूढ झाला! खतरों के खिलाडी मेड इन इंडिया मध्ये ॲक्शन पॅक्ड प्रवेश!

भारताचा सर्वात मोठा स्टंट वर आधारीत रिलिटी शो- खतरों के खिलाडी-मेड इन इंडिया आगामी एपिसोड मध्ये त्यातील बेस्ट साहसांपैकी एक सादर करणार आहे

प्रत्येक मुंबईकराची लाइफलाइन बेस्ट बसेस आहेत ही वस्तुस्थिती लक्षात ठेवून, मास्टर रोहित शेट्टी या स्वप्नांच्या शहराला भावपूर्ण वंदन करणार आहे होस्ट रोहित शेट्टी क्शनने भरलेला प्रवेश करणार आहे



कारण तो बेस्ट बस वर आरूढ होणार आहे आणि स्पर्धकांना एका नव्या स्टंटचा परिचय करून देणार आहे.

रोहित शेट्टीने सांगीतले की मुंबईशी त्याचे जवळचे नाते आहे आणि तो तरूण असताना बेस्ट बस मधून प्रवास करत असे. आता, खतरों के खिलाडी मेड इन इंडियाचा होस्ट म्हणून रोहित त्याच्या मागील प्रवासाच्या आठवणींना उजाळा देणार आहे

अधिक माहितीसाठी, पहा खतरों के खिलाडी मेड इन इंडियाचा एपिसोड २२ आणि २३ ऑगस्ट रोजी रात्री ९:०० वाजता फक्त कलर्स वर

# उर्वशी रौतेला: देवाची कृपा आपले जीवन उजळवत राहो आणि आपल्याला सदैव आशीर्वाद देईल, गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा

गणेश चतुर्थीच्या ११ दिवसाच्या वाढीव प्रसंगी लोक रस्त्यावर एकत्र येऊन ढोल-ताशांच्या आणि गणेश गाण्यांवर नाचतात. रंगीबेरंगी मिरवणुकीसह, मोठ्या प्रमाणात गणपतीच्या मूर्ती पंडाळात उभ्या केल्या जातात. गणपतीच्या स्वागतासाठी मिठाई व प्रार्थना दिल्या जातात. भगवान गणेशचा वाढदिवस म्हणून हा सण साजरा करताच, प्रत्येकामध्ये आनंद आणि खळबळ उडत आहे. साथीच्या रोगादरम्यान, बॉलिवूड सेलेब्स घरीच असतात आणि सर्व आवश्यक खबरदारी घेत असतात, परंतु चाहत्यांसाठी त्यांचे प्रेम आणि आशीर्वाद पाठविणे विसरले नाहीत.



बॉलिवूड सेलिब्रेटी उर्वशी रौतेला हैदराबादमध्ये असून तिचा तेलुगु डेब्यू फिल्म 'ब्लॅक रोझ' चे शूटिंग करत असताना उर्वशी रौतेला म्हणाली, भगवान गणेश या पृथ्वीवर येतील आणि या दरम्यान आलेल्या सर्व त्रास, संघर्ष, आणि समस्यांचा अंत करु दे. त्यांच्या घरी येण्याने आपल्या जीवनात एक नवीन सुरुवात होईल, आम्हाला आनंद, आशा, आत्मविश्वास आणि यशस्वीरीत्या पुढे जाण्यासाठी धैर्याने भर द्या आणि गणेशोत्सव साजरा करा, गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा.

ती पुढे म्हणाली, 'देवाची कृपा आपले जीवन उजळवत राहो आणि आपल्याला सदैव आशीर्वाद देईल. भगवान गणेश तुम्हाला शक्ती देतील, तुमची व्यथा नष्ट करतील आणि तुमच्या आयुष्यात आनंद वाढवतील.'

# जॉर्जिया एंड्रियानीच्या ह्या हॉट फिगरचा काय आहे राज

फॅशन आणि स्टाईलचा विचार केला तर बॉलिवूड सेलिब्रिटीसुद्धा ट्रेंड्स सेट करतात, परंतु हे सर्व लूक त्यांना घालण्याचे मुख्य कारण म्हणजे ते फिट आहेत. हे देखील कारण आहे की ते दीर्घ शूट्सच्या दिवसात टिकू शकतात. एखाद्याची तब्येत टिकवून ठेवण्यासाठी कसरत करणे आणि चांगले खाणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि बॉलीवूड सेलिब्रिटी या व्याख्येस अपरिचित नाहीत.



इटालियन आणि बॉलिवूड डिवा ज्योर्जिया अँड्रियानी एक फिटनेस फ्रीक आहे आणि तिच्या वर्कआउट करायला कधी विसरत नाही. लॉकडाऊन दरम्यान, ज्योर्जियाने पोटातील चरबीसाठी घरी काही प्रयत्न करू शकेल अशा काही द्रुत व्यायाम सामायिक केले. 'तंदुरुस्ती आवश्यक आहे कारण ती आपल्याला सुखी, मजबूत आणि निरोगी ठेवते, जी आपल्या सर्वांच्या धकाधकीच्या जीवनासाठी खूप महत्वाची आहे. एक तंदुरुस्त व्यक्ती आहे आणि तो नेहमीच सक्रिय राहतो, तर जे लोक शारीरिक श्रम करीत नाहीत ते सुस्त असतात.

https://www.instagram.com/p/CERNSFDFGbS/

इटलीच्या सौंदर्य ज्योर्जिया लवकरच 'वेलकम टू बजरंगपूर' चित्रपटाद्वारे श्रेयस तळपदे, संजय मिश्रा आणि तिग्मांशू धूलिया यांच्या अभिनयाने बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. त्याशिवाय अरबाज खान आणि प्रिया प्रकाश वरियर अभिनित बहुप्रतिक्षित 'श्रीदेवी बंगल्या'मध्ये आयटम नंबरसह ते तापमान वाढवणार आहेत

# अड्डा२४७च्या महसुलात पाच पट वाढ

मुंबई, मंगळवार : गुणवत्तापूर्ण शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याच्या आपल्या मोहिमेवर लक्ष ठेवून, चाचणी तयारीसाठी अड्डा २४७भारताची सर्वात मोठी आणि सर्वात वेगवान-वाढणारी शिक्षण-तंत्रज्ञान कंपनीने आपल्या स्थानिक व्यवसायात केवळ तीन महिन्यांच्या कालावधीत पाच पट अशी अभूतपूर्व महसूल वाढ नोंदविली आहे. लॉकडाउन दरम्यान या एडुटेक प्लेयरच्या विद्यार्थी बेसमध्ये देखील या काळात ११०% इतकी उल्लेखनीय वाढ नोंदवली आहे.

अत्याधुनिक ऑनलाइन शिक्षण सुविधा आणि हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त मौखिक भाषांमध्ये अत्यधिक वापरकर्त्यांसाठी अनुकूल सामग्री ऑफर केल्यामुळे कंपनीची प्रभावी वाढ झाली आहे. कंपनीच्या प्रादेशिक युट्यूब चॅनेलचे सध्या तामिळ, तेलगू, मराठी आणि बंगाली वाहिन्यांमधील सुमारे १५.५ लाख ग्राहक आहेत.

प्रादेशिक भाषांमध्ये बँकिंग, एसएससी, आरआरबी एनटीपीसी इत्यादी सर्व स्पर्धात्मक राष्ट्रीय परीक्षांसाठी दर्जेदार अभ्यास सामग्री आणि ई-सामग्री प्रदान करण्याव्यतिरिक्त, अड्डा२४७ पश्चिम बंगाल सिव्हिल सर्व्हिससारख्या स्थानिक भाषांमध्ये स्पर्धात्मक राज्य परीक्षांच्या विविधतेचा समावेश करत आहे.

अड्डा२४७ चे संस्थापक अनिल नागर म्हणाले, देशातील विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष एक आव्हानात्मक राहिले. पारंपारिक शैक्षणिक आणि शिक्षण वाहिन्या खंडित झाल्यामुळे, असंख्य विद्यार्थ्यांसाठी एक व्यवहार्य शिक्षण परिशिष्ट प्रदान करणे पूर्णपणे एडुटेक उद्योगावर अवलंबून होते. आम्हाला अभिमान आहे की आमच्या शैक्षणिक सुविधेद्वारे आम्ही विद्यार्थ्यांपर्यंत आणि संभाव्य उमेदवारांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झालो आहोत. आम्ही अड्डामध्ये उत्कृष्ट संभाव्य शिक्षण कार्यक्रम आणि पूर्वतयारी साहित्य सादर करण्यास मनापासून वचनबद्ध आहोत जेणेकरून आमचा विद्यार्थी वापरकर्ता तळागाळातही यश मिळवू शकेल.

# मुंबईमध्ये शुद्ध पाणी देण्याकरिता ल्युब्रिझोल व प्रिन्स पाईप्स फ्लोगार्ड® प्लस सीपीव्हीसी मध्ये करार

मुंबई, मंगळवार : ल्युब्रिझोल ॲडवान्स्ड मटेरिअल्स इन्क. ही जगभरातील सीपीव्हीसी कंपाऊंडची संशोधक व सर्वात मोठी उत्पादक कंपनी आणि प्रिन्स पाईप्स ॲण्ड फिटिंग्ज लि.ने आज भारतामध्ये प्रिन्स फ्लोगार्ड® प्लस सीपीव्हीसी (क्लोरिनेटेड पॉलिव्हिनायल क्लोराईड) पाईप्स आणि फिटिंग्जचे उत्पादन व विक्रीसाठी फ्लोगार्ड® सीपीव्हीसी प्रोसेसर करारावर स्वाक्ष-या केल्या. प्रिन्स पाईप्स ॲण्ड फिटिंग्ज लि.च्या माध्यमातून फ्लोगार्ड® प्लस उत्पादने भारतामध्ये सप्टेंबरपासून उपलब्ध असतील.

या सहयोगाबाबत बोलताना प्रिन्स पाईप्स ॲण्ड फिटिंग्ज लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्री. पराग छेडा म्हणाले, ल्युब्रिझोलसोबतचा आमचा सहयोग लक्षणीयरित्या आमच्या क्षमतांना वाढवतो आणि बाजारपेठेतील आमची गतीशीलता अधिक प्रबळ करतो. प्रिन्स पाइप्सच्या प्रबळ वितरण नेटवर्कसोबत संयोजित ल्युब्रिझोलची ब्रॅण्ड इक्विटी भारतीय पाईपिंग उद्योगक्षेत्रामध्ये प्रबळ व स्थिर सहयोग निर्माण करण्यास सज्ज आहे. आम्हाला भारतीयांच्या सर्वसमावेशक गरजा माहित आहेत आणि आम्ही नवीन तंत्रज्ञानांचा लाभ घेत गृहमालक, सल्लागार व बिल्डर्सना पसंतीचा जागतिक ब्रॅण्ड व दर्जात्मक उत्पादनाचा लाभ देण्यास कटिबद्ध आहोत.

ल्युब्रिझोल भारतातील उष्ण आणि थंड पाण्याच्या प्लंबिंग बाजारपेठेला सेवा देण्यासाठी उच्च दर्जाच्या सीपीव्हीसी कंपाऊंडचा पुरवठा करण्यासाठी कटिबद्ध आहे. प्रिन्स पाईप्स ॲण्ड फिटिंग्ज लि.सोबतचा हा सहयोग भारतातील लाखो नागरिकांना प्रिन्स पाईप्सच्या भारतभरातील प्रबळ वितरण नेटवर्क व धोरणात्मकरित्या स्थापित उत्पादन सुविधांच्या माध्यमातून शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याच्या फ्लोगार्ड प्लसच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करेल, असे टेम्पराइटॲ इंजीनिअर्ड पॉलिमर्सचे महाव्यवस्थापक विन्स मिसिटी म्हणाले.

दोन दशकांहून अधिक काळापासून फ्लोगार्ड® प्लसचा भारतीय घरे व इमारतींमध्ये उपयोग केला जात आहे. आमच्या परवाना भागीदारींच्या पाठिंब्यासह आमची कटिबद्धता कायम राहिली आहे. आमचे भागीदार ल्युब्रिझोलच्या दशकांहून अधिक काळापासून जागतिक प्लम्बिंग बाजारपेठेची समज आणि सीपीव्हीसी उत्पादनामधील कौशल्यांमधून लाभ घेत आहेत. भारतातील प्लम्बर्स, अभियंते, बिल्डर्स व कन्सल्टण्ट्सना जागतिक दर्जाची पूर्तता करणाऱ्या आणि ग्राहकांचे समाधान करणाऱ्या फ्लोगार्ड प्लसच्या उच्च कार्यक्षमतेबाबत खात्री पटली आहे.

# सुनील ग्रोव्हर आपल्या शोमध्ये कपिल शर्माला करतील आमंत्रित !

स्टार भारतचा नवीन शो 'गॅंग्स ऑफ फिल्मिस्तान' ने प्रेक्षकांमध्ये चांगलाच उत्साह निर्माण केला आहे. विनोदी किंग सुनील ग्रोव्हरच्या टेलिव्हिजनमध्ये परत आल्याने चाहते उत्साहित आहेत!

सूत्रांच्या माहितीनुसार आम्हाला कळले आहे की कपिल शर्मा शोमध्ये पाहुणे म्हणून येणार आहे. कपिल आणि सुनील दोघांमध्ये मतभेद असल्यामुळे ते दोघे लोकांमध्ये चर्चेचा विषय राहिले आहेत.

परंतु कालांतराने आपण दोन्ही अभिनेत्यांमधील सर्व समस्या सोडवल्याचे दर्शवित आहेत आणि सर्व काही ठीक होत आहे. दोघेही त्यांच्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करत आहेत, पण प्रेक्षकांना ही उत्तम जोडी एकत्र दिसू शकेल अशी कोणतीही बातमी नाही.

या शोच्या निर्मात्यांनी या शोसाठी सर्वोत्तम काम करण्यास कोणतीही कसर सोडली नाही. आशा आहे, ही नवीन चळवळ पुन्हा या महान जोडीला एकत्र आणेल.

गॅंग्स ऑफ फिल्मिस्तान या शोच्या माध्यमातून चक्क बॉलिवूड अत्यंत रंजक मार्गाने प्रेक्षकांसमोर येत आहे. हा शो बॉलिवूड जिंकला तर त्यातच श्वास घेतो. या शोमध्ये अदभूत स्टारकास्ट आहे जिथे तुम्हाला शिल्पा शिंदे, सुगंध मिश्रा, उपासना सिंह, डॉ संकेत भोसले आणि बरेच काही दिसेल. सुनीलच्या एक्स फॅक्टरमुळे तो चॅनलच्या सर्व दर्शकांसाठी ट्रीटपेक्षा कमी नाही. शोचे प्रीमियर काउंटडाउन आणि खळबळ सुरू झाली आहे. ३१ ऑगस्ट पासून दर सोमवारी ते शुक्रवार रात्री ८ वाजता हा कार्यक्रम फक्त स्टार भारत वर पहा

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, २६ जुलै ते १ ऑगस्ट २०२२


संपादकीय...



## शेतक-यांना दुहेरी फटका

भारत सरकारने गहू, तांदूळ, डाळी, पीठ, लस्सी, ताक, पनीर इत्यादी खाद्य पदार्थांच्या २५ किलोपेक्षा कमी पॅकिंगवर पाच टक्के जीएसटी (वस्तू व सेवा कर) आकारण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी फक्त मोठ्या कंपन्यांच्या ब्रॅडेड पॅकिंगवरच कर लावला जात होता. आता तो सर्वच पॅकिंग करून विकल्या जाणा ्या वस्तूंवर लावला जाणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १८ जुलैपासून सुरूदेखील झालेली आहे. या घोषणेनंतर प्रसार माध्यमांतून फक्त महागाईची व ग्राहकांना होणा ्या त्रासाची चर्चा होत आहे. यामुळे शेतक ्यांना बसणा ्या फटक्याचा मात्र विचार होताना दिसत नाही. शेतकरी-शेतमजूर हा देखील सर्वांत मोठा ग्राहक वर्ग असून खाद्यान्नावरील जीएसटीने वाढत्या महागाईचा या वगार्ला फटका बसणार आहे, हे विसरून चालणार नाही.

या घोषणेवर टीका सुरू झाल्यानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, की हा निर्णय सर्वच राज्य सरकारांच्या प्रतिनिधींच्या संमतीने घेण्यात आला आहे. परंतु, त्यांनी अशीही घोषणा केली, या वस्तू पॅकिंग करून न विकता सुट्या विकल्या तर त्यावर जीएसटी आकारण्यात येणार नाही. उदा. गहू, डाळी, पीठ, तेल वजन करून सुटे विकले तर त्यावर ह्यजीएसटीह्ण लागणार नाही. व्यवहार सोयीचा व जलद व्हावा, म्हणून आजकाल सर्वच दुकानदार एक किलो, दोन किलो, चार किलोच्या पॅकिंगमध्ये धान्य-डाळी-पीठ ठेवतात. यावर ह्यजीएसटीह्ण लागणार की नाही, हा संभ्रम कायम आहे. २५ किलोच्या वरच्या पॅकिंगवर ह्यजीएसटीह्ण लागणार नाही. म्हणजेच कंपन्या ३० किलोचे पॅकिंग करतील व ह्यजीएसटीह्ण वाचवतील. यात छोट्या प्रक्रिया उद्योगांचा मात्र टिकाव लागणार नाही. अर्थमंत्र्यांनी असेही विधान केले की, अन्नधान्यावर कर आम्हीच लावला नाही, तर यापूर्वीही तो लावण्यात येत होता. त्या म्हणतात, यापूर्वी पंजाब सरकार अन्नधान्यावर कर लावून २००० कोटी रुपये, तर उत्तर प्रदेश सरकार ७०० कोटी रुपये गोळा करीत होते. तसेच पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, केरळ, तेलंगणा, तमिळनाडू यांनी तांदूळ तयार करणा ्या प्रक्रिया उद्योगांवर व्हॅट लावलेला आहे.

शेतक ्यांना उत्पन्न कर नाही, खूप सवलती आहेत, अनुदान आहे, असा सर्वत्र प्रसार-प्रचार होत असतो. परंतु शेतक ्यांना आवळा देऊन त्यांच्याकडून कोहळा काढला जातो. आता तर शेतकरीच सर्वांत मोठा करदाता आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खाद्यान्नावर लावलेला जीएसटी विक्रेता हा ग्राहकांकडून वसूल करणार, पण याचा परिणाम शेतक ्यांना मिळणा ्या किमतीवर सुद्धा होणार. शहरातील एका ग्राहकाची प्रतिक्रिया बोलकी आहे. तो म्हणतो, ह्यह्यमी ४०० ग्रॅम एका ब्रॅडेड कंपनीचे दही ३० रुपयांना घेत होतो, आता त्याचे मला ३२ रुपये द्यावे लागतात. हे रोजच्या गरजेचे आहे. म्हणजेच महिन्याला ६० रुपये माझा खर्च वाढला आहे. जो शहरात महिन्याला ६००० ते ७००० रुपये कमवतो, त्यासाठी ६० रुपयांचा बोजा पण अधिक असून याद्वारे तो कमी खायला बाध्य होईल. मग मागणी कमी व पुरवठा वाढला तर भाव पडतील. असे नव्याने जीएसटी लावलेल्या सर्वच अन्नधान्य तसेच प्रक्रियायुक्त पदार्थांबाबत घडू शकते. त्यामुळे या सर्वच शेतीमालाची मागणी घटून भाव पडू शकतो. अर्थात यात सर्वसामान्य शेतक ्यांचे मरण आहे. तमिळनाडू सरकारच्या सहकारी दूध संघाचा लोकप्रिय ब्रॅड अवीन (अंप्रल्ल) संदभार्तील एक बातमी आली आहे की, त्यांनी दूध खरेदीची किंमत तीन रुपये प्रतिलिटरने कमी केली आहे. दही, ताक, तुपाच्या किमतीत वाढ केलेली आहे. तुपाची किंमत ५३५ रुपये प्रतिलिटरवरून ५८० रुपये करण्यात आली आहे.



# मच्छिमारांची लगबग!

## ●१ ऑगस्टपासून मासेमारीवरील बंदी उठणार

**◆मुरूड/प्रतिनिधी**

**पावसाळ्यात दोन महिने बंद असलेली खोल समुद्रातील मासेमारी येत्या १ ऑगस्टपासून अधिकृतपणे सुरू होणार आहे. मुरुड समुद्रकिनारी मासेमारी मोहिमेवर जाण्याच्या पूर्वतयारीची मच्छिमारांची लगबग सुरू झालेली दिसून येत आहे. तर काही मच्छिमार नारळीपौर्णिमेनंतर मासेमारीस निघतील, अशी माहिती मिळाली आहे.**

दरवर्षी १ जूनपासून ३१ जुलैपर्यंत मासेमारीवर बंदी असते. १ ऑगस्टपासून समुद्रातील मासेमारी पूर्ववत सुरू होणार असल्याची माहिती एकदरा कोळी समाज अध्यक्ष तथा मुरूड तालुका मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष पांडुरंग आगरकर यांनी दै. निर्भीड लेखशी बोलताना दिली. वादळी परिस्थिती नसली तरी पाण्याला मोठा करंट आणि वेग असून मासेमारीस निघताना सर्व परिस्थितीचा अंदाज घेवूनच निघावे लागेल. निम्यापेक्षा अधिक नौका नारळी पौर्णिमा अथवा १५ ऑगस्टच्या दरम्यान मासेमारीस निघतील, अशी माहिती त्यांनी दिली. सर्वच नौका अद्याप पाण्यात उतरविलेल्या नाहीत.

ज्या नौका १ ऑगस्टपासून मासेमारीस जाणार आहेत, त्या नौकावर मासेमारी जाळी भरण्यास सुरुवात झाली आहे. खलाशी वर्ग, नौकांची रंगरंगोटी, इंजिन सर्व्हिसिंग, डिझेल इलेक्ट्रिक वस्तु, बर्फ आदी आवश्यक साहित्य, भरले जात आहे.

मासेमारी दालदी जाळी देखील किमती आणि महत्वाची असते. ६ सिलेंडर मोठ्या नौकेवर १३० ते १४० जाळी असतात. अशा प्रत्येक जाळीची किंमत सुमारे ८ हजार असते, अशी माहिती युवा मच्छिमार विक्रांत भोबु, यांनी दिली. मासेमारी करताना काही माशांमुळे जाळी फाटण्याची शक्यता असते. असे झाल्यास मालकाचे खूप नुकसान होऊ शकते. समुद्रात कधी काय होईल, याचा नेमच नसतो. त्यामुळे सतत सतर्क आणि जागृत राहावे लागते अशी माहिती देखील दिली.

## महागाईविरोधात सभागृहात आंदोलन केल्याने काँग्रेसचे चार खासदार निलंबित

**◆नवी दिल्ली/प्रतिनिधी**



महागाई विरोधात सभागृहात फलक घेऊन निदर्शने केल्याबद्दल काँग्रेसच्या चार खासदारांना लोकसभेतून संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी यापूर्वी आंदोलन न करण्याचा करण्याचा इशारा दिला होता. आंदोलन करायचे असेल तर त्यांनी सभागृहाच्या बाहेर आंदोलन करावे, असेही ते म्हणाले होते.

पण काँग्रेसच्या खासदारांनी महागाईविरोधातील आपले आंदोलन सुरूच ठेवले. त्यामुळे काँग्रेसच्या ४ खासदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. परिणामी त्यांना आता संपूर्ण अधिवेशनासाठी मुकावे लागणार आहे. मणिकम टागोर, जोथिमणी, रम्या हरिदास आणि टीएन प्रतापन अशी निलंबित करण्यात आलेल्या काँग्रेस खासदारांची नावे आहेत. निलंबनाची कारवाई केल्यानंतर चारही खासदारांनी संसद भवनासमोरील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ जाऊन जोरदार घोषणाबाजी केली आहे.

दुपारी ३ नंतर महागाईबाबत चर्चेसाठी तयार आहोत, परंतु सभागृहात फलक घेऊन केलेले आंदोलन सहन करणार नाही. तुम्हाला जर फलक दाखवून आंदोलन करायचे असेल तर ते सभागृहाबाहेर करा. मी चर्चेसाठी तयार आहे, माझ्या दयाळूपणाला कमकुवतपणा समजू नका, असा इशारा लोकसभा अध्यक्षांनी दिला. त्यानंतर त्यांनी उद्यापर्यंत कामकाज तहकूब केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहात यावे आणि महागाई व खाद्यपदार्थांवर अलीकडेच वाढवलेल्या जीएसटीबाबत आपले मत व्यक्त करावे अशी मागणी आंदोलनकर्त्या काँग्रेस खासदारांनी केली आहे. तसेच १८ जुलै रोजी पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून महागाईबाबत चर्चा करावी, अशी मागणीही विरोधी पक्षाकडून करण्यात येत आहे.

## विद्यार्थी वाहनाला अपघात; ९ जखमी, चालक ठार

**◆पालघर/प्रतिनिधी**

पालघर सातपाटी रोडवरील चुनाभट्टी येथील सोहेल ईम्पेक्स कंपनी समोर मोठा अपघात झाला आहे. शाळेच्या मुलांना घेऊन जाणारी ईको व्हॅनच्या चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात घडल्याचे प्रथम माहितीत कळले आहे. या अपघातामध्ये सातपाटीकडून पालघरच्या दिशेने ॲक्टिवावरून जाणारा दुचाकीस्वार गंभीर जखमी होवून मयत झाला आहे. मयत इसम पालघर जवळील सातपाटी गावाचा राहणारा असून नाव चेतन मेहेर आहे. सकाळी कामावर जाण्याकरिता तो निघाला असता या भीषण अपघाताचा बळी ठरला.

ईको व्हॅन ही दुचाकीस्वाराला ठोकत पुढे एमईसीबीच्या लोखंडी खांबाला धडक देऊन पलटी झाली. या व्हॅनमध्ये नऊ शाळेकरी मुले होती. सर्व मुलांना उपचाराकरिता पालघर येथील ढवळे रुग्णालयात नेण्यात आले. त्यांना किरकोळ जखमा झाल्या असून सर्वांची प्रकृती व्यवस्थित आहे. मात्र व्हॅन चालकाचा रस्त्यावर फिरत असलेल्या गुरांमुळे ताबा सुटला असल्याचे काही प्रथमदर्शींकडून बोलले जात आहे.

पावसाच्या दिवसात गुरे रस्त्यावर बसलेली किंवा रस्त्यावर फिरत असतात या गुरांमुळे नेहमीच अपघात होत असतात. या आधीही या रस्त्यांवर फिरणाऱ्या गुरांमुळे अपघात होऊन एका दुचाकी स्वाराला जीव गमवावा लागला होता. या रस्त्यावर फिरणाऱ्या गुरांकरिता उपाय म्हणून ग्रामपंचायत, नगर परिषदेत कुठलीही यंत्रणाच नसल्याने निर्दोष वाहनचालकांना आपला जीव गमवावा लागत आहे.

## इंदापूरात शिकाऊ विमान कोसळले

### ● बारामतीतील विमानतळावरून सकाळी केले होते उड्डाण

**◆इंदापूर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात एक शिकाऊ विमान कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इंदापूर तालुक्यातील कडबनवाडी येथे हे शिकाऊ विमान कोसळले आहे. सुदैवाने या अपघातात कुठलीही जीवितहानी झालेली नाही. या विमानात एक महिला पायलट प्रशिक्षण घेत होती.

बारामतीतील विमान तळावरून सकाळी उड्डाण केलेले विमान इंदापूर तालुक्यातील कडबनवाडीजवळ आज कोसळले. मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात काही तांत्रिक बिघाडामुळे झाला असल्याचे सांगण्यात येत आहे.



बारामतीत कार्व्हर एव्हिएशन मार्फत महिला पायलट यांना प्रशिक्षण दिले जाते. आज सकाळी बारामतीतून विमानतळावरून उड्डाण केलेले हे विमान फिरत असतानाच अचानक कडबनवाडी येथील शेतकरी बारहाते यांच्या शेतात कोसळले.

ही घटना समजताच शेजारील पोंदकुले वस्तीवरील तरुण त्या ठिकाणी पोहचले. त्यांनी महिला पायलटला सुरक्षितरित्या बाहेर काढले. या महिला पायलटला किरकोळ जखमा झाल्या असून, बाकी विमानाची मात्र दुरवस्था झाली आहे. या ठिकाणी बारामतीतून अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे पथक तिथे पोहोचले आहे.

# दोघांचे सरकार ताम्रपट घेवून आले का?

## ●विरोधीपक्ष नेते अजितदादा सत्ताधाऱ्यांवर कडाडले

**◆मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात स्थापन झालेल्या शिंदे सरकारकडून मागच्या कामांना स्थगिती देण्याचा धडाका लावला आहे. मात्र असे करण्याचे काहीच कारण नव्हते. वास्तविक ही प्रक्रिया आहे. सरकार येत असतात आणि जात असतात. आता हे दोघे आलेत ते ताम्रपट घेऊन आलेत काय? हेही कधीतरी जाणारच आहेत, अशी टीका विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली. आज अजित पवारांनी पत्रकार परिषद घेत राज्य सरकारवर निशाणा साधला.

शिंदे सरकारविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस अधिक आक्रमक होण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीच्या कामांना शिंदे सरकारकडून स्थगिती देण्यात येत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस उच्च न्यायालयात देखील धाव घेत याचिका दाखल करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या







या भूमिकेनंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

२०२१ पर्यंतची कामे बंद करणे योग्य नाही. विकासाची कामे होती. महाराष्ट्रातील कामे होती, कुणाच्या घरादारातील कामे नव्हती. छत्रपती संभाजी महाराजांच्या वढू ग्रेथील नियोजित स्मारकाचा निधीही स्थगितीमुळे रखडलाय. राजर्षी शाहू महाजारांचा निधीही अडकलाय. मुख्यमंत्री महोदय आणि उपमुख्यमंत्री महोदय असे खालच्या पातळीवरचे राजकारण महाराष्ट्रात झाले नव्हते. हे तातडीने थांबवा, असे आवाहन अजित पवारांनी केले आहे.

२५ जुलै उजाडल्यानंतरही पावसाळी अधिवेशन अद्याप झाले नसल्याची टीकाही अजित पवारांनी केली. अधिवेशन तारखा सातत्याने पुढे जात आहे. हे सरकार जर बहुमत आहे तर मग अधिवेशन का घेत नाही. विधीमंडळात आमदारांना आपले प्रश्न मांडता येतात. परंतु जाणीवपूर्वक अजूनही मंत्रिमंडळ विस्तार आणि अधिवेशन घेतले जात नाही. मुख्यमंत्री दिल्लीला जातात, पण जनतेचे काय?, असा सवालही अजित पवारांनी उपस्थित केला.

## पावसाची रिपरिप

**◆अलिबाग/प्रतिनिधी**

राज्यभर पावसाची रिपरिप सुरू असल्याने सगळीकडे पावसाने थैमान घातल्याचे चित्र आहे. जून महिना कोरडा गेल्याने पावसानेही त्याचा अनुशेष भरून काढताना जुलै महिन्यात हातचे काही न राखता बरसताना दिसत आहे.

## मतदान कार्डाशी आधार कार्ड लिंक करणार

**◆मुंबई/प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाने महत्वाचा निर्णय घेत निवडणूक मतदान कार्डाशी आधार कार्ड लिंक करण्याचे ठरवले आहे. निवडणूक आयोगाच्या या मोहिमेला १ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. महाराष्ट्रातून या मोहिमेला सुरुवात होणार असल्याची माहिती समोर आली आहे. आधार आणि मतदान ओळखपत्र लिंक केल्यामुळे मतदाराची ओळख पटवणे अधिक सोपे होणार असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

आधार कार्ड तुमच्याकडे नसेल तर इतर ११ कागदपत्र पर्याय म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत. याआधी १ जानेवारी रोजी १८ वर्ष पूर्ण होणारा व्यक्ती मतदानासाठी ग्राह्य धरला जात होता.

## भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांनी याचिका घेतली बिनशर्त मागे

**◆मुंबई/प्रतिनिधी**

मजूर संस्थेचे सदस्य म्हणून अपात्र ठरवल्याच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका भाजपचे विधान परिषदेतील आमदार प्रवीण दरेकर यांनी आज (सोमवार) बिनशर्त मागे घेतली.

न्यायालयात धाव घेण्याऐवजी सहकार मंत्र्यांकडे दाद मागा, असे न्यायालयाने मुंबै बँक प्रकरणी विधान परिषदेचे माजी विरोधीपक्ष नेते दरेकर यांना जून महिन्यातील सुनावणीच्या वेळी सुनावले होते. त्यावेळी दरेकरांच्या याचिकेला राज्य सरकारने विरोध केला व याचिका फेटाळण्याची मागणी केली होती. त्यानंतर याप्रकरणी संबंधित विभागाकडे दाद का मागितली नाही? अशी विचारणा न्यायालयाने दरेकर यांना केली होती. त्यावर सहकार विभागाकडे यासंदर्भात अपील करण्यात आले असल्याचे दरेकरांकडून खंडपीठाला सांगण्यात आल्याननंतर, संबंधित विभागाच्या मंत्र्यांना सांगून अपील प्रलंबित असल्याचे सहकार मंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्या, असेही खंडपीठाने दरकेरांना सुनावले होते.

न्यायमूर्ती प्रसन्न वराळे आणि न्यायमूर्ती किशोर संत यांच्या खंडपीठासमोर आज (सोमवार) दरेकर यांची याचिका सुनावणीसाठी आली. त्यावेळी याचिका बिनशर्त मागे घेतली.

पोलीस बातमी पत्र



# देशभरात 'आरे वाचवा'चा एल्गार...

# आरेतील मेट्रो कारशेडला वाढता विरोध, पर्यावरणवाद्यांची निदर्शनं

**मुंबई :** मेट्रो आरे कारशेडच्या कामावरची स्थगिती गुरुवारी राज्य सरकारनं उठवल्याचा निर्णय घेतला आणि राज्यसह देशभरात पुन्हा एकदा आरे वाचवा मोहीमेला सुरुवात झाली. आरे मेट्रो कारशेडला विरोध करणारे आंदोलन आणखी तीव्र झालं आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाला विरोध करण्यासाठी आम आदमी पार्टी पक्षानं देखील पुढाकार घेतला असून आरे वाचवण्यासाठी आंदोलनात उतरला आहे. एकीकडे पर्यावरणप्रेमी, प्राणीप्रेमी आणि त्यात राजकीय विरोधी पक्षसुद्धा आंदोलनाला पाठिंबा देत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. केवळ मुंबईच नाहीतर नागपूर, वाराणसी, हैदराबादसारख्या प्रमुख शहरांत पर्यावरण प्रेमींनी राज्य सरकारच्या भूमिकेविरोधात एल्गार पुकारला आहे.

मुंबईत पर्यावरणप्रेमींच्या विरोधामुळे आणि राजकीय कुरघोडीत अडकलेल्या




आरे कारशेडचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. आरे कारशेडवरील स्थगिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उठवली. पर्यावरणाच्या कारणामुळे ठाकरे सरकारनं आरे कारशेडचं काम थांबवलं होतं. त्यानंतर कांजूरमार्ग इथं कारशेड करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर मेट्रो कारशेडचा वाद न्यायालयात पोहोचला होता. पण महाविकास आघाडी सरकार कोसळलं आणि शिंदे-फडणवीस सरकार येताच आरेमध्ये पुन्हा कारशेड करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता आरे कारशेडला घातलेली स्थगिती अधिकृतपणे उठवल्यानं तांत्रिक अडचण दूर झाली आहे. त्यामुळे आरेमध्ये कारशेडचं बांधकाम पुन्हा सुरु करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**शिवसेनेचा सुरुवातीपासून विरोध**

आरेतील वृक्षतोड आणि मेट्रोच्या कारशेडला शिवसेनेने पहिल्यापासून विरोध केला आहे. वृक्षतोडीवरुन आदित्य ठाकरे यांच्यासह शिवसेनेनं आक्रमक भूमिका घेतली होती. सत्तेत आल्यावर आरेला जंगल घोषीत करणारच, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी तत्कालीन भाजप सरकारला इशारा दिला होता. आरे मेट्रो कारशेडप्रकरणी हायकोर्टानं हिरवा कंदील दाखवत कारशेडसाठीच्या वृक्षतोडीला विरोध करणा-या सर्व याचिका फेटाळून लावल्याचा आदेश येताच रात्रीत आरे कॉलनीमध्ये वृक्षतोड करण्यात आली होती. वृक्षतोडीला सुरुवात होताच पर्यावरणप्रेमींकडून तीव्र विरोध केला होता. तसंच या विरोधात नागरिकांनी आंदोलनंही केली होती. सर्वोच्च न्यायालयात हायकोर्टाच्या निर्णयाविरोधात अपील करण्याआधीच झाडे तोडल्याने नागरिकांनी राज्य सरकार, मेट्रो प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला होता.

# मुंबईतील खड्ड्यावरुन मनसे आक्रमक

## आयोजित केली अनोखी स्पर्धा, खेळाडूंना महापालिका खड्डा चषकाने गौरवणार

**मुंबई :** मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणत रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. या खड्डयांमुळे मुंबईकर त्रस्त झाले आहेत. आता या खड्डयांचा विरोध दर्शवण्यासाठी मनसेने आगळा वेगळा मार्ग शोधलाय. होय, मुंबईतील खड्डयांविरोधात मनसेने अनोखी स्पर्धा आयोजित केली आहे. मनसेनं चक्क या खड्डयांमध्ये क्रीडा स्पर्धा आयोजित केली आहे. यामध्ये आता अनेक युवा खेळाडू आपलं कौशल्य दाखवतील. पण या अनोख्या स्पर्धाद्वारे मनसेनं बीएमसी निवडणूक प्रचाराचं रणशिंग फुंकलं असल्याचं बोललं जातेय. मनसेने आयोजित केलेल्या स्पर्धेत युवा खेळाडू भल्यामोठ्या खोलउथळ खड्डयांवर आपला खेळ सादर करणार आहेत. लांब उडी, ट्रीपल उडी, स्लो वॉंक, वॉंक रेस, बॅलेंन्स उडी इत्यादी खेळांची ही स्पर्धा रंगणार आहे. खेळात सहभागी होणा-या खेळाडूंना महापालिका खड्डा चषकाने गौरविण्यात



येणार आहे. मनसेच्या या स्पर्धेची सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे चांदिवली विभागाध्यक्ष महेंद्र भानुशाली यांनी ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पदेर्चं ठिकाण हे चँपियनशिप मैदान-नारी सेवा सदन रोड, हिमालय सोसायटी, होमगार्ड जवळ आहे. रविवारी सकाळी 11 वाजता स्पर्धेला सुरुवात होणार आहे. मनसेनं मुंबईतील प्रचाराला सुरुवात केली आहे. काही दिवसांमध्ये मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुका होणार आहेत. प्रत्येक पक्ष यासाठी तयारीला लागला आहे. सत्ताधारी शिवसेनेला खाली खेचण्यासाठी इतर पक्षांनी कंबर कसली आहे.

## विरारमध्ये वाहन दुर्घटनेत दोघांचा मृत्यू, दोन जण जखमी




विरारमध्ये एका वाहन दुर्घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन जण जखमी झाले आहेत. विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. विरार पूर्व चंदनसार येथील राई पाडा परिसरात आज सकाळी ५ वाजताच्या दरम्यान मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या दिशेने एका कारमधून चार जण प्रवास करत असताना अचानक चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार एका झाडावर जाऊन आदळली आणि दोन तीनदा उलटून ती रस्त्याच्या खाली जाऊन पडली. यात दिपेश मचंर्डे (२२), जतीन पाटील(२१) यांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर दोन जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

# मराठी भाषेतील पाट्यांबाबत सुप्रीम कोर्टाची राज्य सरकार आणि BMC ला नोटीस...

मराठी पाट्यांसाठी सरकारनं केलेल्या कायद्याला रिटेल ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशन या व्यापा-यांच्या संघटनेनं आता सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यावर न्यायालयानं राज्य सरकार आणि महापालिकेला नोटिसा जारी केल्या आहेत. या याचिकेवर आता सप्टेंबरमध्ये सुनावणी होणार आहे. व्यापा-यांच्या संघटनेनं याआधी मुंबई उच्च न्यायालयातही आव्हान दिलं होतं. पण उच्च न्यायालयानं राज्य सरकारचा निर्णय वैध ठरवला होता. राज्यात दुकानं आणि आस्थापनांवरील नामफलकांमध्ये मराठीतील अक्षरं अन्य भाषेतील अक्षरांएवढीच मोठी असावीत, असा कायदा ठाकरे सरकारनं केला होता. त्याविरोधात व्यापारी संघटनेनं सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे.

मुंबईसह राज्यातील सर्व दुकानं आणि आस्थापनांचे नामफलक (साईनबोर्ड) मराठीतून लावण्याची सक्ती करर्णाया निर्णयावर सहा महिन्यांची स्थगिती द्यावी, अशी मागणी करत




हॉटेल अँण्ड रेस्टॉरंट्स असोसिएशननं (आहार) हायकोर्टात धाव घेतली होती. यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेनं आपली भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं जारी केले होते. तसेच पालिका प्रशासनानं मराठी पाट्या न लावणा-या दुकानदारांवर सुरू केलेल्या दंडात्मक कारवाईला तूर्तास स्थगिती देण्यास नकारही दिला होता. महाविकास आघाडी सरकारच्या राज्य मंत्रिमंडळाने राज्यातील सर्व दुकाने आणि आस्थापनांचे नामफलक म्हणजेच पाट्या मराठी भाषेत लावण्याची सक्ती करणारा निर्णय घेतला होता. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात हॉटेल अँण्ड रेस्टॉरंट्स असोसिएशन (आहार) यांनी हायकोर्टात आव्हान दिलं होतं.

सर्व दुकाने आणि आस्थापनांचे फलक मराठीतून लावण्याची अंतिम मुदत 31 मेपर्यंत देण्यात आली होती. त्यास सहा महिन्याची मुदत वाढ द्यावी तसेच महापालिकेकडून सुरू केलेल्या दंडात्मक कारवाईला तात्काळ स्थगिती द्यावी, अशी विनंती या याचिकेतून केली होती.

# निवडणूक आयोगाच्या आदेशाविरोधात शिवसेनेने उचलले पाऊल...

# सर्वोच्च न्यायालयात जाणार

*सर्वोच्च न्यायालयात पक्षाशी निगडित महत्त्वाच्या बाबी प्रलंबित असताना त्याआधीच चिन्हाची लढाई सुरू झाल्याने शिवसेनेचे पाऊल उचलले आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशाविरोधात शिवसेना सर्वोच्च न्यायालयात जाणार आहे. आयोगानं दिलेल्या नोटीशीवर कोर्टानं स्थगिती देण्याची विनंती करणार असून अनेक बाबी अद्याप कोर्टात प्रलंबित असल्याची याचिका शिवसेनेने केली आहे. निवडणूक आयोगाच्या नोटिशीविरोधात आज (सोमवारी) शिवसेनेचे वकील ही गोष्ट सुप्रीम कोर्टात मेन्शन करणार आहेत.*



**निवडणूक आयोगाच्या आदेशा विरोधात शिवसेनेने उचलले पाऊल, सर्वोच्च न्यायालयात जाणार**

शिवसेनेत फूट पडल्यानंतर आता शिवसेनेचं निवडणूक चिन्ह धनुष्यबाण कोणाकडे राहणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या प्रतिस्पर्धी गटांना पक्षाच्या निवडणूक चिन्हावरील दाव्याच्या समर्थनार्थ ८ ऑगस्टपर्यंत कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. आता निवडणूक आयोगाच्या याच आदेशाविरोधात शिवसेना सुप्रीम कोर्टात जाणार असल्याची महिती आहे. सर्वोच्च न्यायालयात पक्षाशी निगडित महत्त्वाच्या बाबी प्रलंबित असताना त्याआधीच चिन्हाची लढाई सुरू झाल्याने शिवसेनेचे पाऊल उचलले आहे. आयोगाने दिलेल्या नोटीशीवर कोटानें स्थगिती देण्याची शिवसेनेनं विनंती केली आहे. आज सकाळी सुप्रीम कोर्टात शिवसेना ही बाब नमूद करणार आहे. दोन्ही बाजूंना ८ ऑगस्टपर्यंत आपापलं म्हणणं मांडण्यासाठी निवडणूक आयोगाने वेळ दिला आहे. शिवसेना नेमकी कोणाची? शिवसेनेचं चिन्ह धनुष्यबाण हे कोणाचं? ही सर्व लढाई निवडणूक आयोगासमोर सुरू झाली होती. शिवसेनेशी संबंधित मातोश्री गटाने सांगितले आहे की, अनेक प्रश्न पक्षाशी निगडित हे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्या सर्व प्रश्नाची उत्तरे अजून मिळालेली नाही. सुप्रीम कोर्टात जो काही निर्णय होईल, त्यामध्ये पक्षावरती कोणाचं प्राबल्य आहे, याशी संबंधित ब-याच गोष्टी अवलंबून आहे. त्यामुळे शिवसेनेने आयोगाच्या या नोटिशीविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचं ठरलं आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणे संसद, विधानसभेतही आरक्षणाची शिफारस

# ओबीसी विदेसाठी जनगणना

मुंबई प्रतिनिधि

स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच संसद आणि विधानसभेत नागरिकांचा मागास वर्ग वा इतर मागासवर्गीयांना आरक्षण मिळायचे झाल्यास त्यांची स्वतंत्र गणना आवश्यक आहे. त्यासाठी दशकातून एकदा केली जाणारी जनगणना आणि इतर मागासवर्गीयांची विदा (डाटा) गोळा करणारी यंत्रणा एकाच पद्धतीने काम करणारी असावी, अशी शिफारस बांठिया आयोगाने केली आहे.



### पक्षांसाठी सकारात्मक वातावरण

विधान परिषदेत जातिनिहाय जनगणनेचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे. अशीच मागणी बिहारमध्ये विरोधी पक्षांनी केली आहे. या राजकीय मागणीच्या पार्श्वभूमीवर बांठिया आयोगाने जातिनिहाय जनगणनेची शिफारस केली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांच्या मागणीच्या अंमलबजावणीस सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.

### ओबीसींची संख्या ३७ टक्क्यांहून अधिक

सध्या इतर मागासवर्गीयांची अंदाजे लोकसंख्या ३७ टक्के इतकी आहे. मात्र, ओबीसींसाठी कार्यरत असलेल्या संघटनांनी ३७ टक्के हा आकडा चुकीचा असल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षातील ओबीसींची संख्या त्याहून अधिक असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींचे आधीचे राजकीय आरक्षण हे २७ टक्के होते. ते यापुढे तितकेच ठेवण्याची मागणी संघटना, राजकीय पक्ष आणि व्यक्तींनी केली आहे.

### आरक्षणास मदत

दर दहा वर्षांनी जनगणना होते. त्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीची वैधानिक विदा गोळा केली जाते. त्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांना आरक्षण बहाल केले जाते.



अशीच पद्धत इतर मागासवर्गीयांची विदा गोळा करून त्यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण ठरविण्यास साह्यकारी ठरेल, असे आयोगाने अहवालात म्हटले आहे. राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत बांठिया यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली होती. इतर मागासवर्गीयांची नेमकी विदा अर्थात ओबीसींची टक्केवारी जातिनिहाय जनगणनेच्या आधारे ठरविण्याचा मुद्दा पुढे आला होता. यावरून महाराष्ट्रात राजकीय मत मतांतरे झाली.

### जणगणनेला बळ

राज्यात आयोगाच्या विविध स्तरांवरील सुनावणींमध्ये या मागणीसाठीची विदा, दावे संस्थांनी अधिकाऱ्यांसमोर ठेवले. त्यातून जातिनिहाय जनगणनेच्या मुद्द्याला बळकटी मिळाल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.



ज्या प्रमाणात ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर संसद आणि विधानसभेत आरक्षण देण्याची तरतूद केली जाऊ शकते.




## झाड अंगावर पडून वनमजुराचा मृत्यू

**इंदापूर,** सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी तोडत असलेले रस्त्यालगतचे झाड अंगावर पडून शुक्रवारी सकाळी साडेसातच्या सुमारास वनमजुराचा मृत्यू झाला. या घटनेने संतप्त झालेल्या नातेवाईकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घटनेविषयी समाधानकारक माहिती मिळावी या कारणासाठी सुमारे तासभर मृतदेह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आणून ठेवला होता. ज्ञानदेव बाबुराव ससाणे (वय ५५ वर्षे, रा.कळस, ता.इंदापूर) असे मरण पावलेल्या वनमजुराचे नाव होते. ससाणे हे येथील वनपरिक्षेत्र कार्यालयातील रात्रपाळीचे काम संपवून दुचाकीवरून घराकडे जाण्यासाठी इंदापूर-अकलूज रस्त्याने पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गाकडे निघाले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी बाब्रस मळ्याच्या परिसरातील ज्योती स्टील सेंटरच्या इमारतीसमोरचे धोकादायक झालेले कडुनिंबाचे झाड तोडत असताना ससाणे तेथे पोहोचले. तुटत असणारे झाड त्यांच्या अंगावर पडले. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले. त्यांना इंदापूर उपजिल्हा शासकीय रुग्णालयात आणले असता, ते मृत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## मुंबई उच्च न्यायालयाचे निरीक्षण

# ईडी- सीबीआयमध्ये एकवाक्यता नाही

मुंबई प्रतिनिधि

बँकांना हजारो कोटींचा चुना लावून फरार झालेला हिरे व्यापारी नीरव मोदीचा मेहुणा मयांक मेहताबाबत सीबीआय आणि ईडीमध्ये एकवाक्यता नसल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले. मुंबई सत्र न्यायालयाच्या विशेष सीबीआय न्यायालयाने या वर्षी जून महिन्याच्या सुरुवातीला मोदीचा मेहुणा मयांक मेहताला हाँगकाँगमधील त्यांच्या निवासस्थानी परत जाण्याची परवानगी दिली. विशेष न्यायालयाच्या निर्णयाला सीबीआयने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यावर न्या. रेवती मोहिते-डेरे यांच्यासमोकर सुनावणी पार पडली.

मोदी प्रकरणात मेहता आरोपी होते मात्र, त्यांनी मोदींनी केलेल्या फसवणुकीबाबत तपास यंत्रणेला सहकार्य करण्यास तयार असल्याचे सांगितले. त्या मोबदल्यात त्यांना परदेशात आपल्या घरी जाण्यास अनुमती द्यावी, अशी अट घातली होती. ती अट ईडीकडून मान्य केली आणि त्यांच्यावरील रेड कॉर्नर नोटीस मागे घेतली होती. विशेष न्यायाधीशांनी सुनावणीदरम्यान सीबीआयला विचारले होते की, मेहता त्यांच्या खटल्यात आरोपी आहेत का ? तेव्हा त्यांनी नकार दिला होता. पण नंतर त्यांना नवीन माहिती आणि पुरावे सापडले असल्याचे सांगितले.

### मेहताचे असहकार्य

सर्व पुरावे २०१८ आधीपासूनच ईडीकडे होते, असा दावा मेहतांच्यावतीने अँड. अमित देसाई यांनी केला. तसेच मेहता सीबीआयला चोकशीत सहकार्य करत होते. १५ ते १६ वेळा ते सीबीआय कार्यालयात गेले. २९ जून रोजी त्यांना सीबीआयने समन्स बजावले. परंतु, ते यात्रेला गेले होते आणि ते परत आल्यावर उपस्थित राहतील, असे त्यांनी सांगितले पण तो उपस्थित न राहिल्याने ते सहकार्य करत नसल्याचे सीबीआय म्हणत



असल्याचेही देसाई यांनी न्यायालयाला सांगितले. पुढील सुनावणी २५ जुलै रोजी निश्चित केली.

# 2 वर्षात मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त होणार!

## इकबाल सिंह चहल यांचा विश्वास

**मुंबई :** मुंबईतील रस्ते सिमेंट कॉंक्रिटीकरणाला वेग देण्यात आला असून येत्या दोन वर्षात सर्व कामे पूर्ण होऊन मुंबई खड्डे मुक्त होईल, असा विश्वास महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने डॉ. इकबाल सिंह चहल यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी मुंबईतील रस्ते सुधारणा कामांचा आढावा घेतला. यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरासू, उपायुक्त (पायाभूत सुविधा) उल्हास महाले आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुंबई महानगरातील रस्ते सुधारणा उपाययोजनांबाबत महानगरपालिका आयुक्त डॉ. चहल यांनी बैठकीत सादरीकरण केले.

सध्या 236 किलोमीटर अंतराच्या रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम सुरु आहे. तर 400 किलोमीटरची कामे प्रस्तावित असल्याचेही त्यांनी सांगितले. 2023-24 मध्ये आणखी 423 किलोमीटरचे रस्ते सिमेंट कॉंक्रिटीकरण काम हाती घेणार आहोत. मुंबईतील नवीन सिमेंट रस्त्यांवर पाण्याचा निचरा होण्यासाठी ठराविक



अंतरावर असतील शोषखड्डेही असतील, असे त्यांनी सांगितलं. मुंबई महानगरात चांगल्या प्रतीचे रस्ते बांधण्यासाठी होत असलेली कामे आणि रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करून होत असलेल्या सुधारणा यांचा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आढावा घेतला. जोरदार पावसामुळे रस्त्यांवर झालेले खड्डे लवकरात लवकर भरून काढून वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित राहील, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला केल्या. यंदा 236.58 किमी लांबीच्या रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण काम होत आहे. त्यासाठी दोन हजार 200 कोटी रुपयांचा खर्च होत आहे. तर आणखी तब्बल 400 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काम याच वर्षी प्रस्तावित आहे. एवढेच नव्हे तर उर्वरित 423.51 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण देखील पुढच्याच वर्षी हाती घेण्याचा महानगरपालिका प्रशासनाचा मानस आहे. म्हणजेच पुढील दोन वर्षात मुंबईतील रस्ते खड्डे मुक्त होतील, याचा महानगरपालिका प्रशासनाला विश्वास आहे, असे आयुक्तांनी बैठकीत नमूद केले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898